# लॉकडाऊन मधील रासेयो उपक्रम

## १) कोरोना जनजागृती (पोस्टरद्वारे)

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवक यांनी घरून कोरोना जनजागृती केली यामध्ये त्यानी पोस्टरवर घरी राहा सुरक्षित राहा, माझ्यासाठी नव्हे तुमच्यासाठी, सतत धुऊयात २० सेकंद हात, करू कोरोनावर मात, शिंकताना खोकतांना रुमाल धरू, शासन यंत्रणेस सहकार्य करू. एक मीटर अंतर पाळू गळा भेट हस्तांदोलन टाळू. आदी पोस्टरवर लिहून व्हाटसप द्वारे जनजागृती केली केली. तसेच रासेयो कार्याक्रमाधीकारी प्रा. शिवशंकर मोरे यांनी जनता कर्फू मध्ये सहभागी व्हाकुटुंबाची काळजी घ्या असे पोस्टर बनवले. तसेच गावामध्ये जनजागृती केली







घरून पोस्टर द्वारे कोरोना जनजागृती करतांना स्वयंसेवक धीरज हाडे व वैभव पुरी












अमृत सेवाभावी संस्था परभणी

# कै.कु.दुर्गा.क बनमेरू विज्ञान महाविध्यालय लोणार,

*ता.लोणार जी.बुलडाणा पिन-४४३३०२*

*७ एप्रिल २०२०*

## "जागतिक आरोग्य दिना निम्मीत्त काही सुचनाचे पालन करू या कोरोना पासून जग वाचऊया"




**आज सर्व जग ज्या महामारीतून जात आहे त्याला आपण थांबऊ शकतो त्यासाठी आपण काही खालील नियम पाळावे लागीतील**

१) आपल्या घरातील कोणी व्यक्तीस जर सर्दी,ताप,खोकला असल्यास त्या व्यक्तीस स्पर्श टाळा व त्वरित डॉक्टराशी संपर्क करा

२) साबणाने किमान २० सेकंद प्रत्येक तासाला स्वच्छ हात धुवा

३) प्रशासनाच्या सुचनाचे काटेकोर पाने पालन करा

४) बाहेरून आल्यास स्वच्छ हातपाय धुवा तो पर्यंत घरातील वस्तूस स्पर्श करू नका

५) विनाकारण घराबाहेर बाहेर पडू नका ,घरातच रहा जीवन वाचवा,परिवार वाचवा

काही शंका आल्यास खालील नंबर संपर्क करा ०२०-२६१२७३९४

**राष्ट्रीय सेवा योजना कै.कु.दुर्गा.क बनमेरू विज्ञान महाविध्यालय लोणार**



संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती संलग्नित,

अमृत सेवाभावी संस्था परभणी

# कै.कु.दुर्गा.क बनमेरू विज्ञान महाविध्यालय लोणार,

ता.लोणार जी.बुलडाणा पिन-४४३३०२

**कोरोनाला आपल्या देश्यातून हद्दपार करण्यासाठी तसेच कोरोन ला तिसऱ्या स्टेज मध्ये जाऊ नये यासाठी आपण काही काळजी घेऊ या व कोरोना मुक्त भारत करण्यास सहकार्य करू या.**

१) घरातील कोणी व्यक्ती बाहेर गेल्यास त्यांना मास्क किवां रुमाल बांधण्यास सांगा.तसेच बाहेरून आल्यास शक्य असल्यास अंघोळ करून घ्या. व अंगावरील कपडे धुऊन काढा अथवा उन्हामध्ये किमान ५ तास वाळत ठेवा.

२) कोणतेही किरणा सामान घेतांना किमान अंतर ठेवा. सामान घरात आणल्यास किमान ४-५ तास बाहेर ठेवा.

३) भाजीपाला आणल्यास प्रथम कोमट पाण्यात थोडे मीठ टाकून स्वच्छ करून घ्या.त्या नंतर हात स्वच्छ धुऊन घ्या.

४) दुध पिशवी बाहेरून आणल्यास स्वच्छ धुऊन घ्या.त्यानंतर हात स्वच्छ धुऊन घ्या.मग लगेच दुध उकळून घ्या.

५) श्यक्यतो घरातील लहान मुले व जेष्ठ व्यक्तींना घराबाहेर पाठऊ नये.

६) फ्रीज मधील थंड पाणी अथवा थंड पदार्थ खाणे टाळावे.

७) सर्दी,ताप,यासारखे आजार असल्यास प्रथम डॉक्टर यांच्याशी फोनवर बोलून घ्या त्यांच्या सल्यानुसारच उपचार घ्या किरकोळ आजारासाठी बाहेर जाणे टाळावे.

८) दारावरील बेल कोणी येऊन गेल्यास सानिटायझरने पुसून घ्या.

९) प्रतेक वेळेस हात स्वच्छ धुऊन घ्या,स्वच्छ रहा स्वच्छता ठेवा.

१०) " घरातच रहा,कोरोनाला हरवा "

*"घराबाहेर आम्ही पडणार नाही ,कोरोनाला हरवल्याशिवाय राहणार नाही"*

राष्ट्रीय सेवा योजना कै.कु.दुर्गा.क बनमेरू विज्ञान महाविध्यालय लोणार

## २) कोरोना सर्वेमध्ये सहभाग

दि.२८ मार्च २०२० ते ५ एप्रिल २०२० :- कोरोना या संसर्गजन्य आजाराच्या पार्श्वभूमीवर प्रतेक गावामध्ये पुणे मुंबई येथून काही नागरिक येत आहेत त्या अनुषंगाने प्रत्येक गावात अंगणवाडी सेवका,आरोग्य सेवकयांच्या सोबत नागरिकाचा सर्वे करण्यात आला.यामध्ये काही स्वयंसेवक,स्वयंसेविका यांनी सहभाग नोंदवला यामध्ये आपल्या घरात किती व्यक्ती आहेत,कोणी आजारी आहे काय,कोणी कुटुंबामध्ये बाहेरगाव वरून आले आहे काय याबाबात विचारणा करण्यात येऊन स्वयंसेवक यांनी मदत केली.



मु.पो.शारा या गावात अंगणवाडी सेवका यांच्या सोबत सर्वे करतांना सागर डव्हळे



मु.पो.गोहगाव येथे अंगणवाडी सेवका यांच्या सोबत सर्वे करतांना स्वयंसेविका कु.आरती चेडगे

## ३) मास्क वाटप

दि.१६ एप्रिल २०२० रोजी :- कोरोना रोगाचा संसर्ग होऊ नये यासाठी प्रत्येकाने मास्क वापरणे गरजेचे आहे तरी सर्वांना मास्क घेणे परवडत नाही व बाजारातून आणलेले मास्क हे फक्त एक दिवस वापरावे लागतात.ते वारंवार घेणे परवडत नाही यासाठी घरी बनवलेले मास्क आपण स्वच्छ धुऊन वापरू शकतो.तसेच आपण नका तोंडाला रुमाल वापरतो यामुळे संसर्ग होण्यापासून बचाव होतो.तसेच घरी बनवलेले मास्क सुद्धा यासाठी उपयोगी ठरते म्हणून रासेयो स्वयंसेवक धीरज हाडे,मंगेश हाडे,वैभव हाडे यांनी आपल्या गावामध्ये मास्क तयार करून गावामध्ये मोफत वाटप केले. या स्वयंसेवक यांनी जवळपास २२० मास्क गावामध्ये वाटप केले.








मु.पो.बागुलखेड येथे मास्क बनवून घेतांना व वाटप करतांना स्वयंसेवक धीरज हाडे व वैभव हाडे

## ४) कोरोना प्रश्नमंजुषा

कोरोना जनजागृती साठी राष्ट्रीय सेवा योजना या विभागाद्वारे मा.प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली कोरोना या रोगाविषयी असलेल्या माहिती या बद्दल दि.२४ एप्रिल २०२० रोजी ऑनलाईन परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये जवळपास ५४ प्राध्यापक २५८ रासेयो स्वयंसेवक ३२ नागरिक यांनी सहभाग घेतला.यासाठी सर्वांना ऑनलाईन प्रमाणपत्र वितरीत करण्यात आले. यासाठी गूगल फॉर्म या ऑनलाईन सोफ्टवेर चा उपयोग करण्यात आला.यासाठी रासेयो कार्याक्रमाधीकारी प्रा.शिवशंकर मोरे यांनी परिश्रम घेतले.




वरील प्रमाणे कोरोना प्रश्नमंजुषा परीक्षेचे प्रमाणपत्र अश्या वितरीत करण्यात आले

## ५) सामाजिक अंतर जनजागृती

दि.२९ एप्रिल २०२० कोरोना ह्या महामारी पासून तसेच संसर्ग होण्यापासून जर आपणास दूर राहायचे असेल तर सामाजिक अंतराचे पालन करणे आवश्यक आहे.कारण संसर्ग झालेल्या व्यतिच्या संपर्कात आल्यास त्याच्या खोकल्या पासून तसेच शिंकण्यापासून संसर्ग होऊ नये यासाठी सामजिक अंतर पाळणे आवशक आहे.परंतु जीवनावश्यक वस्तू घेतांना गर्दी होत असते ती होऊ नये म्हणून मु.पो.शारा येथे स्वयंसेवक सागर डव्हळे याने राशन दुकनसमोर गर्दी होऊ नये म्हणून चुना टाकून मार्क केले तसेच राशन घेण्यासाठी आलेल्या जेष्ठ नागरिक यांना राशन घेऊन दिले व काहीना त्यांच्या घरपोच नेउन दिले



कोरोना जनजागृती व जेष्ठ नागरिक यांना सावलीत बसवून राशन सागर डव्हळे देतांना

## ६) १० कुटुंबाना दत्तक

कोरोना या जीवघेण्या आजारापासून जनतेस सुरक्षित ठेवण्यासाठी शासनाने संपूर्ण देशात टाळेबंदी घोषित केली आहे.तरी या संपूर्ण काळात मजूर, अपंग, गरीब लोकांच्या हाती काहीच काम नाही त्यामुळे त्याच्यावर उपासमारीची वेळ आली आहे.त्यामुळे महाविध्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनंमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन संपूर्ण शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची मीटिंग घेऊन सर्वानुमते दहा कुटुंब दत्तक घेण्याचे ठरवले .तसेच सर्वाच्या आर्थिक सहकार्याने रासेयो दत्तक ग्राम पिंपळनेर येथील मा.सरपंच संजय सानप यांच्या सोबत चर्चा करून त्यांच्या कडून गावातील गरीब, होतकरू, अपंग असे १० कुटुंब दत्तक घेण्यात आले.रासेयो कार्याक्रमाधीकारी प्रा.शिवशंकर मोरे, ग्रंथपाल प्रा.जितेंद्र डांगे सर, श्री.अनिल बनमेरू, श्री.रमेश मापारी, श्री.नागोराव यमालवाद आदी कर्मचारी यांनी दि.५ मे २०२० रोजी मा.सरपंच संजय भाऊ सानप यांच्या उपस्तीतीत सर्व दहा कुटुंबाना देण्यात आले. यामध्ये दत्तक कुटुंबाना एक महिन्याचे राशन पुरेल एव्हडे जीवनावश्यक वस्तू जसे, गहू, तांदूळ, तेल, चहापत्ती, तिखट, हळद, मीठ मसाले आधी साहित्य वितरीत करण्यात आले.सदर साहीत्य वाटप करण्यासाठी रासेयो स्वयंसेवक वैभव सानप.सुरेश मुसळे, माउली सानप यांनी मदत केली.दत्तक ग्राम पिंपळनेर येथे दत्तक घेतलेले दहा कुटुंब खालील प्रमाणे.

| अ.क्र. | दत्तक कुटुंब प्रमुखाचे नाव | पत्ता |
|---|---|---|
| ०१ | आशा नामदेव वाणी | सर्व मु.पिंपळनेर पो.जांबूल ता.लोणार जि बुलडाणा |
| ०२ | जितेंद्र खंडू वाळके | |
| ०३ | आशा महादू खरे | |
| ०४ | फातेमाबी शेहनाज | |
| ०५ | राधाबाई लक्ष्मण दराडे | |
| ०६ | अर्जुन सीताराम कुटे | |
| ०७ | पांडुरंग हनुमंत गाव्वाने | |
| ०८ | वायदुनिसा शेख इब्राहिम | |
| ०९ | चंद्रभागा बाबुराव कुटे | |
| १० | शोभाबाई गजानन डोईफोडे | |




दत्तक ग्राम कुटुंबाला जीवनावश्यक साहित्य वाटप करतांना




दत्तक ग्राम कुटुंबाला जीवनावश्यक साहित्य वाटप करतांना रासेयो कार्याक्रमाधीकारी प्रा.शिवशंकर मोरे,ग्रंथपाल प्रा.डांगे सर ,श्री.नागोराव यमलवाड,श्री.रमेश मापारी गावाचे सरपंच श्री.संजय सानप व रासेयो स्वयंसेवक माउली सानप वैभव सानप,सुरेश मुसळे.

# बनमेरु महाविद्यालयाने घेतले दहा कुटुंब दत्तक

**लोणार ■ तालुका प्रतिनिधी**

येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू महाविद्यालय यांच्या राष्ट्रीय सेवा योजना या विभागांतर्गत दत्तक ग्राम पिंपळनेर येथील दहा कुटुंब कोरोना या गंभीर आजाराच्या पार्श्वभूमीवर दत्तक घेतले. ज्यांचे पोट हे केवळ दैनंदिन कामावर अवलंबून आहे अश्या कुटुंबाच्या हाताला काही कामधंदा नसल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. यावर प्राचार्य डॉ. प्रकाश क.बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची ऑनलाईन मिटींग घेऊन आपणही सामाजिक उपक्रमात सहभागी होऊया देश संकटात असताना आपलेही कर्तव्य आहे. या उद्देशाने पिंपळनेर येथील दहा कुटुंब यामध्ये विधवा, अपंग आहेत की जे कोणतेही काम करू शकत नाही. तसेच त्यांना उत्पनाची कोणताही



अन्नधान्याचे वाटप करतांना महाविद्यालयाचे कर्मचारी

सोय नसून परिस्थिती एकदम हालाकिची आहे अश्या दहा कुटुंबाला लॉकडाऊन संपेपर्यंत अत्यावश्यक सामान घरापर्यंत पोहचवणार आहेत. यासाठी ८ मे रोजी महाविद्यालयातील कर्मचारी लखन बनमेरू, रमेश मापारी, नागोराव यमलवाड, तसेच ग्रंथपाल डांगे गावात अन्नधान्य किट घेऊन गेले. यावेळी गावातील सरपंच संजय सानप उपस्थित होते.

रासेयो स्वयंसेवक वैभव सानप, सुरेश मुसळे, माऊली सानप, यांनी या किटचे वाटप केले. यावेळी गावात कोरोना रोखण्यासाठी जनजागृती करण्यात आली. यामध्ये घरी रहा सुरक्षित रहा, शासनाच्या आदेशाचे पालन करा, तसेच गावात नविन व्यक्ती आल्यास त्यांची माहिती अंगणवाडी सेविका, पोलीस पाटील अथवा, कोतवाल यांना देणे याबाबत माहिती सांगितली.

बातमी दै.देशोन्नती

## ई-वेबिणार

## "कोरोनामुळे विध्यार्थावरील मानसिक ताण व उपाय" (२५ जुलै २०२०)

लोणार येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात दि.२५ जुलै रोजी एक दिवसीय राष्ट्रीय वेबिनारचे आयोजन "कोरोनामुळे विद्यार्थ्यांवरील मानसिक ताण व उपाय "या विषयावर कै.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय व जीवनविद्या मिशन ,मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले होते.यासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून आदरणीय प्रल्हाद वामनराव पै यांना मार्गदर्शन केले.तर प्रमुख उद्घाटक म्हणुन मा. डॉ.दिनेश सातंगे संचालक विद्यार्थी विकास विभाग संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती हे होते.कार्यक्रमाचे प्रमुख आयोजक तथा महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर यांनी आपल्या प्रास्ताविकात या राष्ट्रीय वेबिनारचा उद्देश स्पष्ट केला.यामध्ये त्यांनी विद्यार्थ्यी आज कोरोनामुळे शिक्षणापासून,महाविद्यालयापासुन,दुरस्त झाले असुन सततच्या गंभिर परिस्थिती मुळे त्यांचे मानसिक संतुलन खालावत चालले आहे यासाठी आम्ही या वेबिनारचे आयोजन करण्यात आले आहे असे ते म्हणाले.यानंतर प्रमुख उद्घाटक डॉ.दिनेश सातंगे यांनी विद्यार्थ्यांनी कोनत्याही प्रकारे खचुन न जाता आहे या परिस्थितीला सामोरे जात आपन आपले ज्ञान वाढवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे .सध्या आपल्या विद्यापिठामार्फत विवीध ऑनलाईन कोर्सेस चालु आहे यामध्ये आपण सहभागी होऊन आपल्या ज्ञानामध्ये सर टाकु शकता असे ते म्हणाले.यांनतर आदरणीय दादा उर्फ प्रल्हाद वामनराव पै यांनी आपल्या प्रमुख मार्गदर्शनात आपण जगाची परिस्थिती बदलू शकत नाही पण या कोरोणामूळे उद्भवलेल्या परिस्थितीचा

परिणाम आपल्यावर होऊ न देणे आपल्या हातात आहे. सध्या नैराश्य हा खूप मोठा प्रश्न निर्माण झाला असून मानसिक आरोग्य चांगले ठेवणे महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्यांनी सध्या मिळत असलेल्या वेळेचा सदुपयोग करायला हवा. परीक्षा होतील किंवा नाही याचा विचार न करता ज्ञान मिळवत राहून स्वतःची प्रगती करत राहावे. कोणत्याही क्षेत्रात काम करताना आपला हेतू चांगला व मोठा असावा तसेच देशहिताचा असावा असे त्यांनी सांगितले. आपले विचार नेहमी चांगले व सकारात्मक असावे व व्यापक विचार करून सर्वांचे भले व्हावे असा असावा आशावाद ठेवावा. आपल्याला मदत व मार्गदर्शन करणाऱ्या विषयी आपण कृतज्ञता व्यक्त केली पाहिजे असे त्यांनी सांगितले.

सदर वेबिनार हा झुम या ऑनलाईन ॲपवर व युट्युब लाईव्ह करण्यात आला होता.यामध्ये जवळपास एक हजार लोकांनी नोंदणी करून ३२५ सहभागी यांनी ऑनलाईन बघीतला.सदर वेबिनारचे सुत्रसंचालन या कार्यक्रमाचे समंन्वयक प्रा.शिवशंर मोरे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.सौरभ गायकवाड यांनी केले.यामध्ये डॉ.सुर्यकांत बोरूळ, प्रा.कमलाकर वाव्हळ,यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला.तसेच जीवनविद्या मिशनचे सदस्य मा.श्री.अनिल राठी,या.श्री.विष्णु सरोदे,सौ.पुजा पवार यांचे मोलाचे सहकार्य लाभले.






अमृत सेवाभावी संस्था परभणी संचालित

कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय,
लोणार ता.लोणार जि.बुलडाणा ४४३३०२
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित


एक दिवशीय राष्ट्रीय वेबिणार

"कोरोणामुळे विध्यार्थ्यावरील मानसिक ताण"

शनिवार दि. २५ जुलै २०२०, वेळ :- सकाळी ११.०० वा

वेबिणार कार्यक्रमपत्रिका

| अ.क्रं | कार्यक्रम | प्राध्यापक/मार्गदर्शकाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| १ | Technical Test | प्रा.सौरभ गायकवाड,प्रा.डॉ.महेंद्र भिसे,प्रा.रामेश्वर देव्हडे. | 10.55-11.00 |
| २ | सूत्रसंचालन | प्रा.शिवशंकर मोरे | 11.00-11.05 |
| ३ | प्रास्ताविक | प्राचार्य,डॉ.प्रकाश बनमेरू | 11.05-11.15 |
| ४ | उद्घाटक परिचय | प्रा.कमलाकर वाव्हळ | 11.15-11.20 |
| ५ | प्रमुख उद्घाटक परिचय | डॉ.दिनेश सातंगे (संचालक,विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती) | 11.20-11.25 |
| ६ | प्रमुख मार्गदर्शक परिचय | डॉ.सुर्यकांत बोरूळ | 11.25-11.35 |
| ७ | मार्गदर्शन | मा.प्रल्हाद वामनराव पै.(दादा) (B.Tech.IIT Powai, MBA,Jamanlal Bajaj Mumbai TQM,Japan) युवा मार्गदर्शक, आजीवन विश्वस्त जीवन विद्या मिशन मुंबई. | 11.35-12.55 |
| ८ | आभार प्रदर्शन | प्रा.सौरभ गायकवाड | 12.55-1.00 |



वेबिणार मध्ये प्रास्ताविक मार्गदर्शन करतांना प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू सर तर प्रमुख मार्गादर्शन करतांना मा. प्रल्हाद पै दादा व सदर कार्याक्रमाचे लाईव्ह युटूब प्रक्षेपण .

## रक्तदान शिबीर १ ( २ ऑक्टोबर २०२०)

कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात दि.महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतिने २आक्टोबर २०२० रोजी रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.सदर रक्तदान शिबीर हे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले.संस्थेचे सचिव डॉ.संतोष बनमेरू व रक्त संकलन अधिकारी डॉ.साईनाथ तोडकर यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी महात्मा गांधी यांच्या जयंतीदिनी रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.कोरोनाच्या महामारीत रक्ताचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे.तसेच बुलढाणा जिल्ह्यात तर अजुनच रक्ताची कमतरता आहे अशी बातमी सुध्दा आली होती.या शिबिमध्ये कोरोना विषाणू संसर्गातुन वाढतो यासाठी सामाजिक अंतर पाळुन यासोबतच प्रत्येक रक्तदात्याने रक्तदान केल्यानंतर बेड संपुर्ण निर्जंतुक करण्यात येत होता अशी विषेश काळजी घेऊन शिबीर घेण्यात आले.या शिबिमध्ये १३ बा◌ॅटल रक्त संकलन करण्यात आले.यामध्ये स्वयंसेवक सागर डव्हळे,कु.जोत्स्ना राठोड,वैभव मोरे,यशकुमार चव्हान, नितीन मापारी,तसेच प्रा.सुर्यकांत बोरूळ,प्रा.सोरभ गायकवाड, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.नागोराव यमलवाड, गजानन सोनुने यांनी रक्तदान केले.रक्त संकलन करण्यासाठी बुलढाणा येथील शासकीय रक्त पेढी येथील रक्त संकलन अधिकारी डॉ.साईनाथ तोडकर यांच्यासह डॉ.सपकाळ सर मेश्राम मॅडम उपस्थित होते.या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे यांनी परीश्रम घेतले.





महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्रीयांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करतांना मा.संतोष बनमेरू डॉ.सपकाळ सर आदि मान्यवर.






रक्तदान करतांना स्वयंसेवक प्रा.सौरभ गायकवाड व इतर



# बनमेरू महाविद्यालयाच्या शिबिरात १३ विद्यार्थ्यांचे रक्तदान

रक्तदान शिबिरात सहभागी विद्यार्थी व शिक्षक

**लोणार** ■ शहर प्रतिनिधी

स्थानिक लोणार येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतिने २आक्टोबर रोजी प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरु यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.यावेळी संस्थेचे सचिव डॉ.संतोष बनमेरू व रक्त संकलन अधिकारी डॉ.साईनाथ तोडकर यांनी महात्मा गांधी व लाल बहादूर शास्त्री यांच्या प्रतीमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. सामाजिक अंतर पाळुन यासोबतच प्रत्येक रक्तदात्याने रक्तदान केल्यानंतर बेड संपुर्ण निर्जंतुक करण्यात येत होता अशी विषेश काळजी घेऊन शिबीर घेण्यात आले.या शिबिमध्ये १३ बॉटल रक्त संकलन करण्यात आले.यामध्ये स्वयंसेवक सागर डव्हळे,कु.जोत्स्रा राठोड,वैभव मोरे,यशकुमार चव्हान, नितीन मापारी,तसेच प्रा.सुर्यकांत बोरूळ,प्रा.सोरभ गायकवाड, शिक्षकेत्तर कर्मचारी श्री.नागोराव यमलवाड, गजानन सोनुने यांनी रक्तदान केले.रक्त संकलन करण्यासाठी बुलढाणा येथील शासकीय रक्त पेढी येथील रक्त संकलन अधिकारी डॉ.साईनाथ तोडकर यांच्यासह डॉ.सपकाळ सर मेश्राम मॅडम उपस्थित होते.या शिबिरासाठी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे यांनी परीश्रम घेतले.

बातमी दै.लोकमत

## माझे कुटुंब-माझे जबाबदारी व स्न्हेहानुबंध अभियान (४ नोव्हेंबर २०२०)

दि.४ नोव्हेंबर रोजी स्थानिक लोणार येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात 'माझे कुटुंब-माझी जबाबदारी' हे अभियान जनजागृती व तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना या विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेले स्नेहानुबंध अभियान जनजागृती कार्यक्रम महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता.या कार्यक्रचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर, प्रमुख उद्घाटक डॉ.राजेश बुरंगे सर संचालक, राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून मा.श्री.सैपन नदाफ तहसीलदार लोणार व मा.श्री.विठ्ठल केदारे साहेब,तसेच प्रमुख अतिथी म्हणून मा.श्री.पी.ए.करवते,ग्रामसचिव दत्तकग्राम पिंपळनेर,मा.श्री. संजयभाऊ सानप सरपंच हे होते.उद्घाटनपर भाषनात डॉ.बुरंगे सरांनी माझे कुटुंब-माझी जबाबदारी या शासनाच्या उपक्रमा बाबद तसेच विद्यापीठ चालवित असलेल्या 'स्नेहानुबंध' अभियानाबाबद माहिती सांगितली यामध्ये कोरोना रूग्णासोबत यांच्या कुटुंबीयांनी कसे आचरण करावे या तसेच या रूग्णांची तसेच त्यांच्या कुटुंबीयांची  काळजी,तसेच मानसिक संतुलन राखणे गरजेचे आहे हे त्यांनी सांगितले.यानंतर मा.श्री.सैपन नदाफ साहेब यांनी माझे कुटुंब-माझी जबाबदारी हे कोरोणा काळात पाळणे हे प्रत्येक नागरीचे कर्तव्य आहे.प्रशासन सर्वोतोपरी कोरोना कमी करण्यासाठी सदैव प्रयत्नशिल आहे त्यांना सहकार्य करावे.त्यानंतर मा.केदारे सर यांनी नगर परिषद सदैव कार्यतत्पर असते यामध्ये स्वच्छता,  घरोघरी माझे कुटुंब-माझी जबाबदारी हे अभियानासाठी मदत करत आहे असे ते म्हणाले.यानंतर महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना या विभागामार्फत एक कोरोना जनजागृती पोस्टर तयार करण्यात आले होते त्याचे प्रकाशन करण्यात आले.शेवटी अध्यक्षीय भाषणात मा.डाॅ.बनमेरू सरांनी कोविड-१९ या महामारिला आळा घालण्यासाठी प्रत्येक स्वयंसेवकाने वैयक्तिक जबाबदारी समजून घेतल्यास नक्कीच कमी होईल तसेच आपण सार्वजनिक ठिकाणी वावरत असतांना मास्कचा वापर, सामाजिक अंतर पाळणे तसेच सॅनिटायझरचा वापर करणे याबाबत मार्गदर्शन केले.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.मंगेश ठोंबळ सर यांनी केले. सदर कार्यक्रमामध्ये कोरोना प्रतिबंधक सर्व नियमांचे पालन करण्यात आले आहे.




मा.तहसीलदार श्री.सैपन नदाफ व मुख्यकार्यकारी अधिकारी श्री.विठ्ठल केदारे सर यांचे स्वागत करतांना प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू सर




मा.श्री.ए.पी.करवते (ग्रामसचिव,) यांचे स्वागत करतांना प्रा.शिवशंकर मोरे (रासेयो कार्य.) व उदघाटनपर मार्गदर्शन करतांना मा.डॉ.राजेश बुरंगे (संचालक,संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती)




मा.तहसीलदार श्री.सैपन नदाफ व श्री.विठ्ठल केदारे सर मार्गदर्शन करतांना





पोस्टर प्रकाशन करतांना मंचावरील मान्यवर




वरील कोरोना जनजागृती पोस्टर चे प्रकाशन करण्यात आले



कोरोनाचे सर्व नियम पाळून सदर कार्यक्रमास उपस्थित असलेले विद्यार्थी व विद्यार्थिनी





कार्यक्रमापुर्वी सर्व विद्यार्थ्यांचे तापमान व ऑक्शिजन तपासणी करण्यात आली

**पुण्य नगरी**

# ‘माझे कुटुंब’चे पोस्टर प्रकाशन, स्नेहानुबंध अभियान

**लोणार**, दि. ५ (प्रतिनिधी)

येथील कै.कु.दुर्गा क. बनमेरू विज्ञान महाविद्यालयात 'माझे कुटुंब-माझी जबाबदारी' या अभियानासोबतच विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना या विभागांतर्गत राबविण्यात येत असलेले स्नेहानुबंध अभियान जनजागृती कार्यक्रम पार पडला.

अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. प्रकाश बनमेरू होते. उद्‌घाटक म्हणून संचालक डॉ. राजेश बुरंगे, प्रमुख मार्गदर्शक म्हणून तहसीलदार सैफन नदाफ, विठ्ठल केदारे, प्रमुख अतिथी म्हणून पी.ए. करवते, सरपंच संजय सानप उपस्थित होते.



यावेळी डॉ. बुरंगे यांनी माझे कुटुंब-माझी जबाबदारी या शासनाच्या उपक्रमाबाबत तसेच विद्यापीठ चालवित असलेल्या 'स्नेहानुबंध' अभियानाबाबत माहिती सांगितली. यामध्ये कोरोना रुग्णासोबत त्याच्या कुटुंबीयांनी कसे आचरण करावे तसेच रुग्णांची तसेच त्यांच्या कुटुंबीयांची काळजी व मानसिक संतुलन राखणे गरजेचे आहे हे त्यांनी सांगितले. तहसीलदार नदाफ यांनी माझे कुटुंब-माझी जबाबदारी हे कोरोना काळात पाळणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य असल्याचे सांगितले.

दरम्यान, महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजना या विभागामार्फत कोरोना जनजागृती पोस्टरचे प्रकाशन करण्यात आले. अध्यक्षीय भाषणात डॉ. बनमेरू यांनी कोरोनाला आळा घालण्यासाठी प्रत्येक स्वयंसेवकाने वैयक्तिक जबाबदारी समजून घेतल्यास नक्कीच कोरोनाचा प्रभाव कमी होईल तसेच आपण सार्वजनिक ठिकाणी वावरताना मास्कचा वापर, सामाजिक अंतर पाळणे तसेच सॅनिटायझरचा वापर करणे आवश्यक असल्याचे सांगितले. सूत्रसंचालन प्रा. शिवशंकर मोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. मंगेश ठोंबळ यांनी केले.

# माझे कुटुंब माझी जबाबदारी अभियानांतर्गत बनमेरु विज्ञान महाविद्यालयाच्यावतीने जनजागृती

**लोणार** ▪ तालुका प्रतिनिधी

येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालयात ‘माझे कुटुंब-माझी जबाबदारी’ हे अभियान जनजागृती व तसेच संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास व राष्ट्रीय सेवा योजना या विभागा अंतर्गत राबविण्यात येत असलेले स्नेहानुबंध अभियान जनजागृती कार्यक्रम ४ नोव्हेंबर रोजी महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता.



माझे कुटुंब माझी जबाबदारीचे पोस्टर प्रकाशन करतांना। उपस्थित मान्यवर

या कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश बनमेरू, प्रमुख उद्‌घाटक डॉ.राजेश बुरंगे संचालक, राष्ट्रीय सेवा योजना संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती, तसेच प्रमुख मार्गदर्शक म्हणून सैपन नदाफ तहसीलदार लोणार व विठ्ठल केदारे तसेच प्रमुख अतिथी म्हणून पी.ए. करवते, ग्रामसचिव दत्तकग्राम पिंपळनेर, संजय सानप सरपंच हे होते.

डॉ.बुरंगे यांनी माझे कुटुंब-माझी जबाबदारी या शासनाच्या उपक्रमाबाबत माहिती सांगितली. तर सैपन नदाफ यांनी प्रशासन सर्वोतोपरी कोरोना कमी करण्यासाठी सदैव प्रयत्नशिल आहे यानंतर रासेयो या विभागामार्फत कोरोना जनजागृती पोस्टर आले प्रकाशन करण्यात आले.डॉ.बनमेरू यांनी कोविड-१९ या महामारिला आळा घालण्यासाठी प्रत्येक स्वयंसेवकाने वैयक्तिक जबाबदारी समजून घेतल्यास नक्कीच कमी होईल असे सांगितले

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा. शिवशंकर मोरे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ.मंगेश ठोंबळ यांनी केले. सदर कार्यक्रमामध्ये कोरोना प्रतिबंधक सर्व नियमांचे पालन करण्यात आले आहे.

बातमी दै.पुण्य-नगरी

# पोस्टरद्वारे दत्तक ग्राम पिंपळनेर,लोणार येथील विविध शासकीय कार्यालये, येथे जनजागृती अभियान

**(दि.५ नोहें.ते ११ नोव्हेंबर २०२०)**

कै.कु.दुर्गा क.बनमेरु विज्ञान महाविद्यालया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाने कोरोना काळात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश क.बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली एक आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे.यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन व्दारे चालविण्यात येत असलेले माझे कुटुंब-माझी जबाबदारी हे अभियान महाविद्यालयात मार्फत घरोघरी जाऊन जनजागृती अभियान राबवित आहेत.यामध्ये रासेयो अंतर्गत सनपॅक शिट वर कोरोना जनजागृती माहिती तसेच विना मास्क घराममध्ये प्रवेश करू नये,त्यासोबतच स्वच्छ हात धुवावे अशी माहिती या पोस्टवर छापण्यात आली आहे.हे पोस्टर रासेयो दतकग्राम पिंपळनेर येथेयावेळी पिंपळनेर येथील सरपंच या.संजुभाऊ सानप तसेच ग्रामसचिव करवते सर यांच्या हत्ते या उपक्रमाला सुरुवात करण्यात आली. रासेयो स्वयंसेवक यांनी घरोघरी पोस्टर लावून स्वच्छता पाळावी असा संदेश देणात आला.तसेच लोणार येथील तहसिल कार्यालय,ग्रामिण रुग्णालय, कोविड सेंटर, दुय्यम निबंधक कार्यालय या ठिकाणी सुध्दा हे पोस्टर लावण्यात आले तसेच शारा,बागुलखेड,तसेच लोणार येथील पुनर्वसित झोपडपट्टी मधील संपूर्ण परिसर जवळ पास ४०० घरे या ठिकाणी सदर पोस्टर लावण्यात आले. यामधुन कार्यालयात येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला दिसेल अश्या ठिकाणी लाऊन कार्यालयात मास्क बांधुनच प्रवेश करावा हे यातुन पहावयास मिळते. पोस्टर लावण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे तसेच रासेयो स्वयंसेवक वैभव मोरे, वैभव सानप, सुरेश मुसळे यांनी सहकार्य केले.





दत्तक ग्राम पिंपळनेर येथे कोरोन जानगृगती पोस्टर लावतांना सरपंच मा.श्री.संजय सानप मा.श्री.सानप सर रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे व स्वयंसेवक






लोणार येथे ग्रामीण रुग्णालय लोणार,दुय्यम निबंदक कार्यालय येथे पोस्टर लावतांना स्वयंसेवक





पिंपळनेर तसेच लोणार येथील तहसील कार्यालय येथे घरोघरी पोस्टर लावतांना स्वयंसेवक







ग्राम शारा तसेचग्राम कुंडलस येथे कोरोन जनजागृती पोस्टर लावतांना स्वयंसेवक व प्रा.शिवशंकर मोरे

# 'माझे कुटुंब माझी जबाबदारी' अभियानांतर्गत जनजागृती

**लोणार ▪ शहर प्रतिनिधी**

## पोस्टरद्वारे स्वच्छता पाळण्याचा संदेश

स्थानिक लोणार येथील कै.कु.दुर्गा क.बनमेरु विज्ञान महाविद्यालया अंतर्गत राष्ट्रीय सेवा योजना विभागाने कोरोना काळात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.प्रकाश क.बनमेरू यांच्या मार्गदर्शनाखाली एक आगळा वेगळा उपक्रम राबविण्यात येत आहे.

यामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातून महाराष्ट्र शासन व्दारे चालविण्यात येत असलेले माझे कुटुंब-माझी जबाबदारी हे अभियान महाविद्यालयात मार्फत घरोघरी जाऊन जनजागृती अभियान राबवित आहेत. यामध्ये रासेयो अंतर्गत कोरोना जनजागृती माहिती तसेच विना मास्क घरामध्ये प्रवेश करू नये, त्यासोबतच स्वच्छ हात धुवावे अशी माहिती या पोस्टवर छापण्यात आली आहे. पिंपळनेर येथील सरपंच संजय सानप तसेच ग्राम सचिव करवते यांच्या हस्ते या उपक्रमाला




जनजागृती करतांना रासेयोचे विद्यार्थी

सुरुवात करण्यात आली. रासेयो स्वयंसेवक यांनी घरोघरी पोस्टर लावून स्वच्छता पाळावी असा संदेश देण्यात आला. तसेच लोणार येथील तहसील कार्यालय, ग्रामीण रुग्णालय, कोविड सेंटर, दुय्यम निबंधक कार्यालय या ठिकाणी सुध्दा हे पोस्टर लावण्यात आले. यापुर्वी या पोस्टरचे प्रकाशन महाविद्यालयात प्राचार्य यांच्या अध्यक्षतेखाली तसेच तहसीलदार सैपन नदाफ व मुख्यकार्यकारी अधिकारी केदारे यांच्या उपस्थितीत पार पडला होता. सदर पोस्टर लावण्यासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे तसेच रासेयो स्वयंसेवक वैभव मोरे, वैभव सानप, सुरेश मुसळे यांनी सहकार्य केले.

बातमी दै.देशोन्नती

# रक्तदान शिबीर २ (२३ डिसेंबर २०२०)

कै.कु.दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविद्यालय येथे दि.२३ डिसेंबर २०२० रोजी रक्तदान शिबीर आयोजित केले होते.सद्या कोरोनाचा प्रादुर्भाव असून संपूर्ण राज्यात रक्ताचा तुटवडा निर्माण झाला आहे तरी.याबाबद पत्र सुद्धा शासनाने पाठवले होते.त्या अनुषंगाने महाविध्यालायाचे प्राचार्य डॉ.प्रकाश क.बनमेरू यांच्या उपस्थितीत सदर रक्तदानाचे आयोजन करण्यात आले होते.यासाठी शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट/भारत अभियान माँ जिजाऊ अभ्यासिका यांच्या संयुक्त विद्यमाने या रक्तदानाचे आयोजन करण्यात आले होते.यासाठी शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट/भारत अभियानाचे अध्यक्ष मा.विठ्ठलराव जाधव व माँ जिजाऊ अभ्यासिका चे संचालक नितीन मापारी उपस्थीत होते. रक्त संकलन करण्यासाठी अकोला येथील शासकीय स्त्री रुग्णालय येथील रक्त संकलन अधिकारी डॉ.जोशी यांच्या टीम ला आमंत्रित करण्यात आले होते.या शिबिरामध्ये १३ बॉटल रक्त संकलित करण्यात आले होते.यामध्ये महाविध्यालयातील प्रा.डॉ.महेंद्र भिसे,श्री.अनिल बनमेरू व प्रकाश गवई यांनी रक्तदान केले. महाविध्यालायचे हे कोरोना काळातील दुसरे रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते.सदर रक्तदान शिबीरासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे यांनी परिश्रम घेतले.






रक्तदान शिबिराचे जनजागृती पोस्टर व रक्त संकलन अधिकारी मा.डॉ.जोशी सर यांचे स्वागत करतांना प्राचार्य,डॉ.प्रकाश बनमेरू सर




शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट्/भारत अभियानाचे अध्यक्ष मा.विठ्ठलराव जाधव यांचे स्वागत करतांना प्राचार्य,डॉ.प्रकाश बनमेरू सर




रक्तदान करतांना राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक




रक्तदान करतांना रासेयो स्वयंसेवक व प्रा.डॉ.महेंद्र भिसे (वनस्पतीशास्त्र विभाग प्रमुख)




रक्तदान करतांना मा.श्री अनिल बनमेरू (कनिष्ठ लिपिक) व स्वयंसेवक

**लोकमत**

# लोणार येथे रक्तदान शिबीर

लोकमत न्यूज नेटवर्क

**लोणार :** येथील दुर्गा क.बनमेरू विज्ञान महाविध्यालय येथे २३ डिसेंबर रोजी रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरात १३ युवकांनी रक्तदान केले.

सध्या कोरोनाचा प्रादुर्भाव असून संपूर्ण राज्यात रक्ताचा तुटवडा निर्माण झालेला आहे. याबाबत शासनाने पत्र पाठवले होते. त्या अनुषंगाने प्राचार्य डॉ.प्रकाश क.बनमेरू यांच्या उपस्थितीत रक्तदान शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यासाठी शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट/भारत अभियान यांच्या संयुक्त विद्यमाने शिबीर घेण्यात आले. यावेळी शेतकरी आत्महत्या मुक्त महाराष्ट/भारत अभियानाचे अध्यक्ष विठ्ठलराव जाधव उपस्थीत होते.रक्त संकलन करण्यासाठी अकोला येथील शासकीय स्त्री रुग्णालय येथील रक्त संकलन अधिकारी डॉ.जोशी यांच्या पथकाला आमंत्रित करण्यात आले होते.

या शिबिरामध्ये १३ बॉटल संकलित करण्यात आले. यामध्ये महाविध्यालयातील प्रा.डॉ.महेंद्र भिसे, अनिल बनमेरू व प्रकाश गवई यांनी रक्तदान केले. शिबीरासाठी रासेयो कार्यक्रमाधिकारी प्रा.शिवशंकर मोरे यांनी परिश्रम घेतले

रासेयो कार्यक्रमाधिकारी
प्रा.शिवशंकर मोरे

प्राचार्य
डॉ.प्रकाश क.बनमेरू